भिवंडीत ३० महिला बचत गटांचे दिवाळी विक्री प्रदर्शन सुरू

दगडी शाळेच्या प्रांगणात ५ नोव्हेंबरपर्यंत प्रदर्शन; महापौरांकडून कायमस्वरूपी जागेचे आश्वासन



भिवंडी, दि. ३ (वार्ताहर) : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाजकल्याण आणि महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने दिवाळी उत्सवानिमित्त आयोजित महिला बचत गटांच्या विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन महापौर नारायण चौधरी यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या प्रदर्शनात शहरातील ३० महिला बचत गटांनी सहभाग घेतला असून, दिवाळी फराळ, पणत्या, दिवे आणि गृहसजावटीच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.

महानगरपालिकेने एकता शहरस्तरीय संघाच्या सहकार्याने या विक्री केंद्राची उभारणी केली आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. महिला बचत गटांना आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी पालिका प्रशासनाने अल्पावधीत या विक्री केंद्राची उभारणी केली आहे, असे अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे यांनी सांगितले. महिला बचत गटांतील महिलांना कायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी पालिकेने सहकार्य करावे, अशी मागणी एकता शहरस्तरीय संघाच्या अध्यक्षा चंदा बॅनर्जी यांनी केली.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी करण्याचा आनंद भिवंडीकरांना मिळणार आहे. महिला बचत गटांच्या विक्री केंद्रासाठी पालिका प्रशासनाकडून लवकरच हक्काची जागा उपलब्ध करून दिली जाईल, असा विश्वास महापौर नारायण चौधरी यांनी व्यक्त केला. तसेच, शहरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन बचत गटांकडून जास्तीत जास्त खरेदी करावी आणि महिलांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

महापालिकेच्या दगडी शाळेच्या प्रांगणात ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांना येथे खरेदी करता येणार आहे.

उद्घाटनप्रसंगी अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे, प्रभाग समिती क्रमांक पाचचे सभापती ॲड. वैभव भोईर, भाजपचे गटनेते संतोष शेट्टी, नगरसेविका रोमा आळशी, नगरसेवक मलिक मोमिन, नगरसेविका सुगंधा टावरे, नगरसेवक मयूर पाटील, रोटरी क्लब भिवंडीचे अध्यक्ष प्रदीप पप्पू राका, सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, सहाय्यक आयुक्त गिरीश घोष्टेकर, समाजकल्याण विभागप्रमुख मिलिंद पळसुले यांच्यासह नागरिक उपस्थित होते. महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी ही माहिती दिली.

उल्हासनगरच्या फटाका बाजारात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

उल्हासनगर, दि. ३ (वार्ताहर) : उल्हासनगर कॅम्प क्रमांक दोनमधील नेहरू चौक परिसरातील फटाक्यांच्या घाऊक बाजारपेठेत दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. या बाजारपेठेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असताना दुकानांमधील सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या अग्निशमन विभागाने शहरातील ४० फटाक्यांच्या दुकानांची अग्निसुरक्षा तपासणी केली असली, तरी एकाच परवान्यावर एकापेक्षा अधिक दुकाने सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे. नेहरू चौक परिसरात मोठ्या संख्येने फटाक्यांची दुकाने थाटण्यात आली आहेत. दाटीवाटीच्या या बाजारपेठेत व्यापारी आणि ग्राहकांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत आगीची दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचणे आणि बचावकार्य करणे शक्य होईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४ था मजला, डिव्हाईन चाइल्ड हायस्कूलच्या समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ सीआयएन: L99999MH1992PLC066213

(मा. एनसीएलटीच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ च्या आदेशान्वये अवसायन प्रक्रियेत असलेली कंपनी)

ई-लिलावासाठी जाहीर उद्घोषणा

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्यांतर्गत तयार केलेल्या नियमांअंतर्गत नोटीस

याद्वारे खालील स्वाक्षरीकर्त्याद्वारे, सर्वसामान्य जनतेला ई-लिलावाची नोटीस दिली जाते, ज्याद्वारे जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) ("कॉर्पोरेट कर्जदार") च्या मालकीच्या १० (दहा) मालमत्तांच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या) विक्रीसाठी बोली आमंत्रित केल्या आहेत, ज्या नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ ("आयबीसी") आणि त्यांतर्गत तयार केलेल्या नियम आणि विनियमांच्या तरतुदींनुसार कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायन संपत्तीचा भाग आहेत, ही विक्री "जे जसे आहे जेथे आहे", "जे जसे आहे", "जे कसे आहे", "जे काही आहे" आणि "कोणत्याही आश्रयाविना" या तत्त्वावर आणि कोणत्याही सादरीकरण, हमी किंवा नुकसानभरपाईविना केली जाईल.

ही विक्री खालील स्वाक्षरीकर्त्याद्वारे आयबीबीआय (अवसायन प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३२ आणि दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२६ च्या मालमत्ता विक्री प्रक्रिया निवेदनानुसार ("एएसपीएम") https://ibbi.baanknet.com वरील बँकनेट (पूर्वीचे ई-बी-क्रय) या ई-लिलाव प्लॅटफॉर्म ("ई-लिलाव प्लॅटफॉर्म") द्वारे केली जाईल. सर्व संभाव्य बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी नोंद घ्यावी की सर्व पात्रता दस्तऐवज आणि इसारा ठेव रक्कम (ईएमडी) एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता दस्तऐवज) मध्ये नमूद केलेल्या दस्तऐवज सादरीकरणाच्या आवश्यकतांनुसार काटेकोरपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर करणे आवश्यक आहे.

ई-लिलावासाठी महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर पात्रता दस्तऐवज आणि कलम २९ए हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १६ नोव्हेंबर, २०२६, भा.प्र.वे. सायं ५:००**
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा ठेव रक्कम (ईएमडी) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १६ नोव्हेंबर, २०२६, भा.प्र.वे. सायं ६:००**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**गुरुवार, १९ नोव्हेंबर, २०२६, भा.प्र.वे. स. ११:०० ते सायं ५:००**
अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख	खालील स्वाक्षरीकर्त्याकडून अंतिम विक्री मोबदला भरण्यासाठी मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत

रक्कम भारतीय रुपयांमध्ये

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव किंमत*	इसारा ठेव रक्कम (ईएमडी)	बोली वाढीचे मूल्य
१	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - ग्राउंड पॉवर युनिट, आणि हायड्रॉलिक जॅक	3804	5203	२८,८६,०३५	२,८८,६०४	१,४४,३०२
२	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - बॅगेज ट्रॉलीज, कार्गो ट्रॉलीज	3805	5204	४,९९,३३३	४९,९३३	२४,९६७
३	ग्राउंड सपोर्ट व्हेईकल्स - महिंद्रा बोलेरो, मारुती ईको आणि मारुती व्हॅन	3806	5205	२४,४८,८९५	२,४४,८९०	१,२२,४४५
४	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - टोयोटा टोईंग ट्रॅक्टर आणि फोर्कलिफ्ट्स	3808	5206	७२,५७,३५८	७,२५,७३६	३,६२,८६८
५	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - टी १३५ इलेक्ट्रिकल टोईंग ट्रॅक्टर	3809	5207	७७,३२,३९२	७,७३,२३९	३,८६,६२०
६	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - बॅगेज ट्रॉलीज, कार्गो ट्रॉलीज	3810	5208	२२,७०,६२५	२,२७,०६३	१,१३,५३१
७	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - फायर एक्स्टिंग्विशर्स आणि ट्रॉलीज	3811	5209	३९,८६६	३,९८७	१,९९३
८	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - वायकिंग ट्रॉलीज, व्हील रॅक ट्रॉलीज	3812	5210	१,५७,९११	१५,७९१	७,८९६
९	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - टोयोटा टो टग	3813	5211	१०,२६,७८८	१,०२,६७९	५१,३३९
१०	ग्राउंड सपोर्ट इक्विपमेंट - एअर कंडिशनिंग युनिट	3996	5212	४८,०३,२६८	४,८०,३२७	२,४०,१६३

*एएसपीएमच्या कलम १९ (खर्च, व्यय आणि कर परिणाम) मध्ये अधिक विशेषतः वर्णन केल्याप्रमाणे, विक्री पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले कर, आकार, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि सर्व लागू आवश्यक खर्च वगळून. खालील स्वाक्षरीकर्ते किंवा नुकसानभरपाई दिलेला पक्षद्वारे (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) कोणतीही सादरीकरणे, हमी किंवा नुकसानभरपाई प्रदान केली जाणार नाही.

महत्त्वाच्या नोंदी:

१. वर सूचीबद्ध केलेल्या १० मालमत्तांसाठी **बँकनेट** पोर्टलवर ई-लिलाव आयोजित केला जाईल.

२. ही विक्री नोटीस आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी मालमत्तांचे तपशील, घोषणापत्रे, प्रतिज्ञापत्रे आणि हमीपत्रे, आणि वरील मालमत्ता आणि लिलाव आयडी विरुद्ध **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing** वर बँकनेटवर किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या www.jetairways.com या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या "ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी व शर्ती" समाविष्ट असलेल्या एएसपीएमसह वाचली जावी.

३. संभाव्य बोलीदारांनी एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता दस्तऐवज) नुसार आवश्यक पात्रता दस्तऐवज आणि ईएमडी केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित वेळेत सादर करणे आवश्यक आहे आणि ते अवसायककडे सादर करू नयेत.

४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि दस्तऐवज आणि ईएमडी सादर करण्याबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी, संभाव्य बोलीदारांना बँकनेटशी +९१ ८२९१२२०२२० आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधण्याची विनंती केली जाते.

५. ई-लिलावासंबंधी कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया अवसायकाचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनपवार (+९१-८२०८५०३६९३), यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर "ग्राउंड सपोर्ट अँड केटरिंग असेट सेल - दिल्ली" या विषय रेषेसह संपर्क साधावा. कृपया नोंद घ्यावी की पात्रता दस्तऐवज आणि बोलीच्या संबंधातील कोणतेही दस्तऐवज अवसायक, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांच्या सल्लागाराला सादर केला जाणार नाही.

६. हे स्पष्ट केले जाते की ही नोटीस विक्री प्रभावी करण्यासाठी खालील स्वाक्षरीकर्ते किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) यांच्यावर कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. खालील स्वाक्षरीकर्त्यांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.

७. हे स्पष्ट केले जाते की येथे आणि एएसपीएममध्ये नमूद केलेले मालमत्तेचे तपशील केवळ सामान्य संदर्भ उद्देशांसाठी काटेकोरपणे प्रदान केले आहेत. नुकसानभरपाई दिलेले पक्ष (एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) मालमत्तांच्या वर्णनात किंवा स्थितीत कोणत्याही प्रकारची कमतरता/चुकीची माहिती/विसंगती/चुकीचे विधान/वगळणे/बदल/तूट किंवा त्रुटीसाठी कोणतीही जबाबदारी किंवा दायित्व स्पष्टपणे नाकारतात आणि घेणार नाहीत, मग अशी विसंगती ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर उघडकीस आली असो वा नसो. मालमत्तांची विक्री काटेकोरपणे "जे जसे आहे जेथे आहे", "जे जसे आहे", "जे कसे आहे" आणि "कोणत्याही आश्रयाविना" या तत्त्वावर आणि कोणत्याही सादरीकरण, हमी किंवा नुकसानभरपाईविना आयोजित केली जाते.

८. अंतिम विक्री मोबदल्याचे प्रदान एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदल्याचे प्रदान) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या वेळेमर्यादा, व्याज तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.

९. अवसायक, सीओसीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यांतर्गत अन्यथा तरतूद केल्याखेरीज, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबविण्याचा अधिकार राखून ठेवतात.

सही/-
सतीश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे अवसायक
आयपी नोंदणी क्र.: **IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056**
एएफए क्र.: **AA1/10056/02/311226/108454**
एएफए ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत वैध
ईमेल - **liquidation.jet@gmail.com**

दिनांक: ०४.११.२०२६
ठिकाण: मुंबई

महाराष्ट्र शासन
उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

पत्ता: श्रीप्रस्था, नालासोपारा-विरार, लिंक रोड, एच. पी. पेट्रोलपंपच्या पुढे, निळेमोरे, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर
Email ID- vasaisdo@gmail.com

क्र. व्हीडी/टेनन्सी/संकीर्ण/नं. ८३/२०२६
दिनांक ०२/११/२०२६

जाहीर सूचना

याद्वारे जाहीर अवाहन करण्यात येते की, बेबी दत्तू पाटील व इतर यांनी तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण वसई यांच्याकडील दावा क्रमांक ७०ब/०४/२०१४ दिनांक २७/०६/२०२४ च्या विरूध्द इकडील न्यायालयांत क्र. व्हीडी/टेनन्सी/संकीर्ण/नं. ८३/ २०२६ अन्वये अपिल दाखल केलेले आहे. दावा मिळकतीचा तपशिल खालील प्रमाणे.

दावा मिळकतीचा तपशिल

गावांचे नाव	स.नं./ हि.नं.	क्षेत्र (हे.आर)
मौजे-चिखलडोंगरे, ता. वसई	१७९/३/पैकी	०-४८-२ पो. ख. ०-०५-४
	१३६/१/पैकी	०-१९-२ पो. ख. ०-०२-५
	१६७/६/पैकी अ	०-१६-९
	१५९/२३/अ	०-०१-६

प्रस्तुत प्रकरणी खालील सामनेवाले यांस खालील नमुद पत्यावर रजिस्टर ए. डी. ने नोटीस बजावणीकरिता पाठविण्यात आला असुन, सदर खातेदार हे नमुद पत्यावर राहत नसल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. तरी सदर दाव्याची सुनावणी **दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.** उपविभागीय अधिकारी वसई यांचे कार्यालय, पत्ता श्रीप्रस्था, नालासोपारा-विरार, लिंक रोड, एच. पी. पेट्रोलपंपच्या पुढे, निळेमोरे, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर येथे ठेवण्यात आलेली आहे.

त्यामुळे प्रस्तुत अपिल प्रकरणात खालील नमुद सामनेवाले यांनी अगर त्यांचेतर्फे कायदेशीर वारस अगर हितसंबंधित अन्य कोणताही व्यक्ती यांनी सदर जाहीर नोटीसीच्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी वसई यांच्या न्यायालयांत नमुन दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्य त्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेणेत येईल यांची नोंद घ्यावी.

सामनेवाले यांचे नावे

१) फाल्गुनी रजनीकांत ओझा २) सेजल जयंतकुमार शहा ३) हेमाक्षी रमेश शाह ४) पंकज नरेंद्र भंडारी ५) बिना किशोर शहा ६) परेश नरेंद्र भंडारी ७) आशा प्रविणकुमार नालेकर ८) जयेश प्रविणकुमार नालेकर ९) सारिका अतिक पटेल अ. क्र. १ ते ९ रा. ३०१, अनिरूध्द अपार्टमेंट, डॉ. दत्ताराम समेळ मार्ग, लक्ष्मी नारायण मंदिरासमोर, सोपारा, ता. वसई १०) कल्पना सचिन म्हात्रे ११) मनिषा लक्ष्मण पाटील १२) किसन गंगाराम पाटील १३) धर्मा गंगाराम पाटील १४) लक्ष्मी दत्तात्रेय घरत १५) पार्वती ऊर्फ नयना दिपक पाटील १६) गोदीबाई मुकुंद पाटील १७) प्रकाश सखाराम पाटील १८) दिपक सखाराम पाटील १९) कुसुम कमळाकर गावड २०) सुषमा विनोद पाटील २१) श्रध्दा विनोद पाटील २२) साहील विनोद पाटील २३) निहार विनोद पाटील २४) कल्पना धनंजय चौधरी २५) जतिन धनंजय चौधरी २६) हर्षला धनंजय चौधरी २७) कृतिक धनंजय चौधरी ऊर्फ अ. पा. क. कल्पना धनंजय चौधरी २८) शिनुबाई शंकर पाटील अ.पा.क. लक्ष्मीबाई महादेव गावड २९) मधुरा शरद घरत ३०) कैलास शरद घरत ३१) भावना निळकंठ घरत ३२) जय निळकंठ घरत ३३) जेनी निळकंठ घरत ३४) सुजाता मिलिंदद पाटीस सर्व रा. डोंगरपाडा, विरार (प), ता. वसई, जि. पालघर
......सामनेवाले

उपविभागीय अधिकारी वसई

पनवेल महापालिकेच्या विशेष सभेत विविध विकासकामांना मंजुरी

पनवेल, दि. ३ (वार्ताहर) : पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंगळवारी विविध विषयांवर चर्चा करून त्यांना मंजुरी देण्यात आली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ही सभा पार पडली. या सभेत अनाथ व निराधार विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासह शाळांच्या मैदानांचा वापर, कब्रस्तानाभोवती संरक्षक भिंत, गावांचा महापालिका हद्दीत समावेश आणि रस्ते विकासकामांतील डांबराच्या दरवाढीशी संबंधित विषय मंजूर करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका हद्दीत सिडको प्राधिकरणाकडून हस्तांतरित झालेल्या आरक्षित शाळांसाठी असलेली खेळाची मैदाने लगतच्या शाळांना भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव सभेत मंजूर झाला. तसेच, महापालिका क्षेत्रातील अनाथ, निराधार किंवा दोन्ही पालक गमावलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी 'अनाथ बाल शिक्षण शिष्यवृत्ती योजना' सुरू करण्यासही मान्यता देण्यात आली. या योजनेमुळे संबंधित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रभाग समिती 'क' अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील पनवेल रेक्लमेशन मैदानातील कब्रस्तानाभोवती संरक्षक भिंत उभारण्याचा विषयही मंजूर करण्यात आला. याशिवाय पनवेल तालुक्यातील गव्हाण आणि वडघर हे जिल्हा परिषद गट पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव सभेत मंजूर झाला.

महापालिकेच्या प्रभाग समिती 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' अंतर्गत रस्ते दुरुस्ती व अन्य विकासकामांमध्ये वापरण्यात आलेल्या डांबराच्या दरवाढीपोटी संबंधित कंत्राटदारांना वाढीव दरातील फरक अदा करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा विषयही मंजूर करण्यात आला. सभेला आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते.

जीवदानी मंदिराच्या पार्किंगपर्यंत आता काँक्रीट रस्ता



विरार, दि. ३ (वार्ताहर) : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री जीवदानी मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या वाहनतळापर्यंत पोहोचण्यासाठी आता सुस्थितीतील रस्ता उपलब्ध होणार आहे. आमदार राजन नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे पर्यटन विभागाने रस्ता आणि वाहनतळाच्या काँक्रीटीकरणासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या कामाचे भूमिपूजन सोमवारी आमदार नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

पालघर जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून दरवर्षी हजारो भाविक श्री जीवदानी माता मंदिरात दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सव, सण-उत्सव तसेच शनिवार-रविवारच्या सुटीच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होते. खासगी बस आणि मोटारीने येणाऱ्या भाविकांची संख्याही लक्षणीय आहे. मात्र, मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या वाहनतळाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली होती. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने गर्दीच्या वेळी वाहतूककोंडी होत होती. तसेच वाहनतळावर काँक्रीटीकरण नसल्यामुळे पावसाळ्यात भाविकांची गैरसोय होत होती.

या समस्येच्या पार्श्वभूमीवर आमदार राजन नाईक यांनी वाहनतळाकडे जाणारा रस्ता आणि वाहनतळाचे काँक्रीटीकरण करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. यासाठी त्यांनी पर्यटन विभागाकडेही सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर राज्य सरकारच्या पर्यटन विभागाने या कामासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. यासंदर्भातील शासन निर्णयही प्रसिद्ध करण्यात आला आहे. मंजूर निधीतून मुख्य रस्त्यापासून वाहनतळापर्यंत काँक्रीटचा रस्ता तयार करण्याबरोबरच संपूर्ण वाहनतळाचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

Reform ARC LIMITED रिफॉर्म एआरसी लिमिटेड

(पूर्वी रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)

२ रा मजला आयसीसी चेंबर्स, साकी विहार रोड, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज जवळ, पवई मुंबई ४०००७२

सुरक्षित मालमत्तांच्या विक्रीसाठी नोटीस

[नियम ८(६) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ६(२) ची तरतूद पहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार (कर्जदारांना) आणि जामीनदार (जामीनदारांना) नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेल्या, सुरक्षित धनकोकडे गहाण/तारण असलेल्या स्थावर/जंगम मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे.

मे. रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लि. ने दिनांक २९.०३.२०१९ आणि २९.०३.२०२३ च्या दोन स्वतंत्र अभिहस्तांकन करारान्वये खाली नमूद केलेल्या कर्ज खात्यांच्या आर्थिक मालमत्ता/कर्ज आणि त्यावरील हक्क, शीर्षक आणि हितसंबंध सोबत अंतर्निहित तारणांसह **रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वी रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) जी आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट आणि आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट** ची विश्वस्त आहे, त्यांच्या बाजूने अभिहस्तांकित केले आहेत. सदर अभिहस्तांकनाच्या आधारे, आम्ही तुमचे सुरक्षित धनको बनलो आहोत आणि कायदेशीररित्या संपूर्ण करारातील थकबाकी वसूल करण्यास पात्र आहोत. म्हणून, खालील स्वाक्षरीकर्ते रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि. चे प्राधिकृत अधिकारी, याद्वारे तुम्हाला **१५ दिवसांची** नोटीस देत आहेत की खाली नमूद केलेल्या गहाण मालमत्ता खालील स्वाक्षरीकर्त्याद्वारे ई-लिलावाच्या माध्यमातून **"जे जसे आहे जेथे आहे", "जे जसे आहे", आणि "जे काही आहे"** या तत्त्वावर **दिनांक २३.११.२०२६ रोजी**, कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम अधिक पुढील व्याज आणि खर्चाच्या वसुलीसाठी विकल्या जातील, **जी आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट आणि आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट** चे विश्वस्त म्हणून रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वी रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) सुरक्षित धनकोला नमूद केलेल्या कर्जदार/गहाणदारांकडून देय आहे. राखीव किंमत आणि इसारा ठेव रक्कम (ईएमडी) खालीलप्रमाणे आहेत:

गहाण मालमत्तेचे वर्णन:

लॉट क्र.	कर्जदाराचे नाव, मालमत्तेचा तपशील, मागणी नोटीस आणि ताबा तारीख	राखीव किंमत / ईएमडी
	आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट आणि आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट	
१	अनिल सुरेश डावरुंग (सुरेश दगडू डावरुंग यांचे पुत्र), रा. रुम क्र. १०-५/१० ए, तळमजला, अभिनव नगर चाळ, शिवडी क्रॉस रोड, गणेश मंदिराजवळ, वडाळा डेपो जवळ, आरके अपार्टमेंट जवळ, वडाळा, मुंबई, महाराष्ट्र-४०००३१, तसेच येथे: रुचा ड्रेसेस सप्लायर्स, दुकान क्र. १५, दफ्तरी रोड, मालाड पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००९७, पायल अनिल डावरुंग (अनिल सुरेश डावरुंग यांच्या पत्नी) रा. रुम क्र. १०-५/१० ए, तळमजला, अभिनव नगर चाळ, शिवडी क्रॉस रोड, गणेश मंदिराजवळ, वडाळा डेपो जवळ, आरके अपार्टमेंट जवळ, वडाळा, मुंबई, महाराष्ट्र-४०००३१, तसेच येथे: २/१४ गौरी निवास कोकणी पाडा, मंगेश स्कूल जवळ कुरार व्हिलेज मालाड पूर्व एस.ओ. मुंबई महाराष्ट्र-४०००९७ आणि विजय टिकम देशपांडे (टिकम देशपांडे यांचे पुत्र) रा. रुम क्र. ४, मिस्त्रीवाडी चाळ, दफ्तरी रोड, म्युनिसिपल दवाखान्याजवळ मालाड पश्चिम मुंबई महाराष्ट्र-४०००९७ मालमत्ता: दुय्यम-निबंधक वसईच्या क्षेत्रात, गाव चंद्रपाडा, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित असलेल्या स. क्र. १०८, हिस्सा क्र. ११, ज्याचे क्षेत्रफळ १०० चौ. मीटर आहे, आकारणी रु ३.५७ पैसे असलेल्या जमिनीवर वसलेल्या "वडिका दर्शन" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील १ ल्या मजल्यावरील, २५० चौरस फूट म्हणजेच २३.२३ चौ. मीटर अंगभूत (बिल्ट-अप) क्षेत्रफळ असलेल्या फ्लॅट क्र. १०१ या मालमत्तेचे सर्व तुकडे आणि पार्सल. मागणी नोटीस: दिनांक २४.०६.२०२१ रोजी रु. ६,८८,५३२.४२/- (अक्षरी रुपये सहा लाख अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे बत्तीस आणि बेचाळीस पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: ११.०८.२०२३	Rs. 1,20,000/- ------- Rs. 12,000/-
२	किशोर एल गोलकिया आणि चेतना के गोलकिया, दोघेही येथे: २८/बी-२२, ओंकार म्हात्रा, एसव्हीपी नगर, चार बंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००५८, तसेच येथे: घर क्र. ००२, भाग्यलक्ष्मी अपार्टमेंट, धनाजी नगर, बोईसर पूर्व, पालघर, ठाणे, महाराष्ट्र. मालमत्ता: तालुका आणि जिल्हा पालघर, ठाणे, महाराष्ट्र मधील गाव बोईसर, जुना सर्वे क्र. ६१/३, प्लॉट क्र. ११, नवीन भूमापन क्र. ३०/३, ज्याचे क्षेत्रफळ २०० चौ. मीटर (अंदाजे ५२५ चौ. फूट म्हणजेच ४८.७९ चौ. मीटर) आहे, धनाजी नगर येथील भाग्यलक्ष्मी अपार्टमेंटमधील तळमजल्यावरील फ्लॅट क्र. ००२ या मालमत्तेचे सर्व तुकडे आणि पार्सल. मागणी नोटीस: दिनांक २४.०६.२०२१ रोजी रु. १४,१७,५८०.९५/- (अक्षरी रुपये चौदा लाख सतरा हजार पाचशे ऐंशी आणि पंच्याण्णव पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च. सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: १७-११-२०१७.	Rs. 1,25,000/- ------- Rs. 12,500/-
३	सावळाराम विठ्ठल जाधव (विठ्ठल जाधव यांचे पुत्र) आणि कृष्णाबाई सावळाराम जाधव (सावळाराम विठ्ठल जाधव यांच्या पत्नी), दोघेही रा.: रुम क्र. १७४, साई बाबा चाळ, कोयना नगर, अप्पर गोविंद नगर, गोरेगाव पूर्व, मुंबई, मुंबई, महाराष्ट्र-४०००६३, तसेच येथे: ए/३०१, ३ रा मजला, साई स्टार अपार्टमेंट, तुंगारेश्वर नाका, मुंबई-अहमदाबाद हायवे, सातिवली वसई पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००६३ मालमत्ता: तुंगारेश्वर नाका, मुंबई-अहमदाबाद हायवे, सातिवली, वसई पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००६३ येथील साई स्टार अपार्टमेंटमधील ३ ऱ्या मजल्यावरील ए विंग मधील फ्लॅट क्र. ३०१ (अंदाजे ४८.७९ चौ. मीटर) चे सर्व तुकडे आणि पार्सल. मागणी नोटीस: दिनांक २०.१२.२०१७ रोजी रु. १२,५४,७३२.१५/- (अक्षरी रुपये बारा लाख चोपन्न हजार सातशे बत्तीस आणि पंधरा पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च. सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: २०-०८-२०२४	Rs. 3,00,000/- ------- Rs. 30,000/-
४	अमरसिंग आर राठोड (रतन सिंग यांचे पुत्र), १०३, महालक्ष्मी अपार्टमेंट, नित्यानंद नगर, कोपरी विरार, पूर्व ठाणे, महाराष्ट्र-४०१३०५, तसेच येथे: जराग्रटी सफालाव्ला २०७-बी विंग, फेमस अपार्टमेंट, मोरे गाव नालासोपारा (पूर्व) विरार-ठाणे, महाराष्ट्र-४०१२०९, तसेच येथे: फ्लॅट क्र. बी/००२, तळमजला, राम लीला अपार्टमेंट, गाव कोपरी, तालुका वसई, जिल्हा पालघर, वसई-II, विरार, ठाणे, महाराष्ट्र-४०१३०९ आणि संतोष अमरसिंग राठोड (अमरसिंग आर राठोड यांच्या पत्नी) ए-१०३, महालक्ष्मी अपार्टमेंट, नित्यानंद नगर, कोपरी विरार पूर्व ठाणे, महाराष्ट्र-४०१३०५, तसेच येथे: फ्लॅट क्र. बी/००२, तळमजला, राम लीला अपार्टमेंट गाव कोपरी तालुका-वसई, जिल्हा पालघर, वसई-II, विरार, ठाणे, महाराष्ट्र-४०१३०९. मालमत्ता: दुय्यम निबंधक वसई-II विरार, ठाणे, महाराष्ट्र-४०१३०९ च्या क्षेत्रात स्थित, गाव कोपरी तालुका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित आणि असलेल्या सर्वे क्र. ३१ (जुना), १२६ (नवीन), हिस्सा क्र. १ (भाग) वरील १०५० चौ. मीटर क्षेत्रफळ असलेल्या एन.ए जमिनीवरील राम लीला अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील तळमजल्यावरील फ्लॅट क्र. बी/००२ (अंदाजे ४६.९३ चौ. मीटर म्हणजेच ५०५ चौ. फूट (सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ)) चे सर्व तुकडे आणि पार्सल. मागणी नोटीस: दिनांक ११.०१.२०२४ रोजी रु. ३०,०१,०३८.८०/- (अक्षरी रुपये तीस लाख एक हजार अडतीस आणि ऐंशी पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: २०.०४.२०२६	Rs. 4,50,000/- ------- Rs. 45,000/-
५	मंगल जगदीश पेंढारकर (कर्जदार) ४३/१, स. क्र. १/१/३, मिताली क्लासिक, जी.डी सावंत कॉलेज जवळ, पाथर्डी फाटा, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१०, तसेच येथे: रो हाऊस क्र.-१, साईश्री रो हाऊसेस, प्लॉट क्र. २९, सर्वे क्र. ३२६/१/१/३, शहर स. क्र. ७८५९ च्या बाहेर, गाव पाथर्डी तालुका आणि जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक, तसेच येथे: एच/०३/१७, आर्ट रबरच्या मागे, एमआयडीसी- अंबड, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१० आणि जगदीश गोपीनाथ पेंढारकर, ४३/१, स. क्र.-१/१/३, मिताली क्लासिक, जी.डी सावंत कॉलेज जवळ, पाथर्डी फाटा, नाशिक, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१०, तसेच येथे: रो हाऊस क्र.-१, साईश्री रो हाऊसेस, प्लॉट क्र. २९, सर्वे क्र. ३२६/१/१/३, शहर स. क्र. ७८५९ च्या बाहेर, गाव पाथर्डी तालुका आणि जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक, तसेच येथे: एच/०३/१७, आर्ट रबरच्या मागे, एमआयडीसी-अंबड, नाशिक महाराष्ट्र-४२२०१०. मालमत्ता: गाव पाथर्डी तालुका आणि जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक येथे शहर स. क्र. ७८५९ च्या बाहेर, सर्वे क्र. ३२६/१/१/३, प्लॉट क्र. २९ वर बांधलेल्या साईश्री रो हाऊसेस मधील तळमजला + स्टिल्ट मजला + स्टिल्ट पहिला मजला असलेला रो हाऊस क्र.-१ (९०.३० चौ. मीटर क्षेत्रफळ) चे सर्व तुकडे आणि पार्सल. मागणी नोटीस: दिनांक १२.०९.२०१८ रोजी रु. २४,९१,५६३.०२/- (अक्षरी रुपये चोवीस लाख एकाण्णव हजार पाचशे त्रेसष्ट आणि दोन पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: ०६.०८.२०२६	Rs. 26,00,000/- ------- Rs. 2,60,000/-
६	दिनेश कोरगा सुवर्णा (कोरगा बुढा सुवर्णा यांचे पुत्र), रा. ००३, तळमजला साई शंकर सी.एच.एस. लि., शंकरवाडी, जोगेश्वरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००६० तसेच येथे: हनुमान मंदिराजवळ, अलीयावर जंग मार्ग, २/९, समता चाळ कमिटी, शंकरवाडी, जोगेश्वरी पूर्व मुंबई, महाराष्ट्र-४०००६० आणि बेबी कोरगा सुवर्णा (पप्पू पुजारी यांची कन्या), रा. ००३, तळमजला साई शंकर सी.एच.एस. लि., शंकरवाडी, जोगेश्वरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००६० तसेच येथे: शंकरवाडी, समता चाळ क्र-०२, रुम क्र-९, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र-४०००६० मालमत्ता: दुय्यम-निबंधक, वसई-II, विरार ठाणे महाराष्ट्र ४०१३०९ च्या क्षेत्रात, गाव कोपरी, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील स. क्र. ३१ (जुना), १२६ (नवीन), हि. क्र. १ (भाग) वरील जमिनीवर स्थित "राम लीला अपार्टमेंट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ३ ऱ्या मजल्यावरील ५०५ चौ. फूट अंगभूत (बिल्ट-अप) क्षेत्रफळ असलेल्या मालमत्ता फ्लॅट क्र. बी/३०१ चे सर्व तुकडे आणि पार्सल आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध: उत्तर: एन.ए. बी विंग, दक्षिण: मोकळा प्लॉट, पूर्व: मोकळा प्लॉट, पश्चिम: मोकळा प्लॉट. मागणी नोटीस: दिनांक २१.०४.२०२१ रोजी रु. १०,९६,४६८.०६/- (अक्षरी रुपये दहा लाख शहाण्णव हजार चारशे अडुसष्ट आणि सहा पैसे मात्र) अधिक पुढील व्याज आणि खर्च सांकेतिक/प्रत्यक्ष ताब्याची तारीख: २४.०३.२०२३	Rs. 5,00,000/- ------- Rs. 50,000/-

मालमत्तेची तपासणी : २१.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत.
बोली सादर करण्याची अंतिम तारीख : २२.११.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
ई-लिलावाची तारीख : २३.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत, प्रत्येकी ५ मिनिटांच्या विस्तारासह.

विक्रीच्या अटी आणि शर्ती:

१. मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकली जाणार नाही आणि विक्री ही सुरक्षित धनको म्हणून रिफॉर्म एआरसी लिमिटेड (पूर्वी रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) च्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे. २. ई-लिलाव मे. सी१ इंडिया प्रा. लि., प्लॉट क्र. ६८ गुरगाव हरियाणा पिन कोड १२२००३ यांच्यामार्फत ऑनलाइन आयोजित केला जाईल. ३. ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी, इच्छुक बोलीदारांकडे वैध ई-मेल आयडी असावा आणि त्यांनी www.bankeauctions.com या पोर्टलवर त्यांची नावे नोंदणीकृत करावीत आणि मे. सी१ इंडिया प्रा. लि. कडून त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा. ४. संभाव्य बोलीदार **मे. सी१ इंडिया प्रा. लि. कडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात, (संपर्क व्यक्ती: श्री. धरणी कृष्णा, मोबाईल क्र. +९१ ९९४८१८२२२२ वर, Delhi@c1india.com किंवा Support@bankeauctions.com (हेल्पलाईन क्र. ७२९११८११२४, २५, २६).** ५. आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट च्या मालमत्तेसाठी इसारा ठेव रक्कम (ईएमडी) आरटीजीएस/एनईएफटीद्वारे चालू खाते क्र. 6742557088 मध्ये जमा केली जावी, बँकेचे नाव: इंडियन बँक, शाखा: सांताक्रुझ पश्चिम शाखा मुंबई, ४०००५४, लाभार्थीचे नाव: आरएआरसी ०५९ (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट, आयएफएससी कोड : IDIB000S010. कृपया नोंद घ्यावी की ईएमडी साठी चेक/डिमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत. ६. आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट च्या मालमत्तेसाठी इसारा ठेव रक्कम (ईएमडी) आरटीजीएस/एनईएफटीद्वारे चालू खाते क्र. **122505002146** मध्ये जमा केली जावी, बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लि., शाखा: वीरा देसाई शाखा मुंबई, ४०००५८, लाभार्थीचे नाव: आरएआरसी ०८० (आरएचडीएफसीएल एचएल) ट्रस्ट, आयएफएससी कोड: ICIC0001225. कृपया नोंद घ्यावी की ईएमडी साठी चेक/डिमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत. ७. राखीव किंमतीपेक्षा कमी आणि/किंवा ईएमडी रकमेविना असलेल्या बोली स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदार त्यांची पुढील बोली रक्कम प्रति लॉट रु. ५००० च्या पटीत वाढवू शकतात. ८. यशस्वी बोलीदाराने यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झाल्यानंतर लगेचच बोली रकमेच्या/विक्री किंमतीच्या २५% (ईएमडी सह) रक्कम जमा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यशस्वी बोलीदार घोषित झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत बोली रकमेची/विक्री किंमतीची उर्वरित ७५% रक्कम जमा करेल. ९. यशस्वी बोलीदार वर नमूद केल्याप्रमाणे विक्री किंमत जमा करण्यात अपयशी ठरल्यास, ईएमडी सह सर्व ठेवी जप्त केल्या जातील. १०. अयशस्वी बोलीदाराची ईएमडी रक्कम कोणत्याही व्याजाविना, ई-लिलाव विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सात दिवसांच्या आत परत केली जाईल. ११. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेला तपशील त्यांच्या सर्वोत्तम माहिती, विश्वास आणि नोंदींनुसार आहे. कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळलेल्या माहितीसाठी इत्यादींसाठी प्राधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. १२. खालील स्वाक्षरीकर्त्या प्राधिकृत अधिकाऱ्याला कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतीही कारणे न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा विक्री तहकूब/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा किंवा विक्रीच्या कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये सुधारणा करण्याचा पूर्ण अधिकार आणि स्वेच्छाधिकार आहे. १३. बोलीदारांनी मालमत्तेवरील प्रभार/बोजे/वैधानिक देयके याबाबत स्वतः विचारपूर्वक चौकशी करावी आणि त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेचे शीर्षक, विस्तार, गुणवत्ता याबद्दल स्वतःची खात्री करावी. ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर मालमत्तेवरील प्रभार, बोजे आणि इतर कोणत्याही बाबींसंबंधी कोणत्याही स्वरूपाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. १४. उपलब्ध नोंदींनुसार, या नोटीसच्या तारखेला खालील स्वाक्षरीकर्त्यांना मालमत्तांवरील कोणत्याही बोज्याबद्दल कोणतीही माहिती नाही. १५. मालमत्तेच्या विक्रीवरील मुद्रांक शुल्क/नोंदणी शुल्कासह मालमत्तेवरील कोणतीही थकबाकी, देणी, कर, व्हॅट, टीडीएस, जीएसटी, प्रभार, मग ते वैधानिक असोत वा अन्यथा, ते केवळ खरेदीदारालाच सहन करावे लागतील.

कोणत्याही इतर माहितीसाठी, कृपया १८००१०३९७११ / १८६०२६६४१११ / १८००३०९९७११ वर संपर्क साधू शकता.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१) अंतर्गत वैधानिक १५ दिवसांची नोटीस

कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणवटदार यांना याद्वारे सूचित केले जाते की त्यांनी ई-लिलावपूर्वी अद्ययावत व्याज आणि अनुषंगिक खर्चासह वर नमूद केलेली रक्कम भरावी, ज्यात कसूर केल्यास वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तेचा ई-लिलाव होईल आणि काही उर्वरित थकबाकी असल्यास ती व्याज/खर्चासह वसूल केली जाईल. लिलावासाठी निश्चित केलेल्या तारखेला लिलाव विक्रीत कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास, सुरक्षित धनकोला ही मालमत्ता वरील निश्चित केलेल्या राखीव किंमतीवर किंवा त्याहून अधिक किंमतीवर कोणत्याही संभाव्य खरेदीदारास खाजगी कराराद्वारे विकण्याचे स्वातंत्र्य असेल. कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणवटदारांना याद्वारे सूचित केले जाते की त्यांनी गहाण मालमत्तेचा ताबा घेताना तयार केलेल्या पंचनामा/इन्व्हेंटरी अहवालानुसार, ताब्यात घेतलेल्या मालमत्तेत असलेल्या घरातील सर्व वस्तू/वैयक्तिक वस्तू, काही असल्यास, या नोटीसच्या तारखेपासून **७ (सात)** दिवसांच्या आत हलवाव्यात/काढून टाकाव्यात. या नोटीसच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या विहित कालावधीत घरातील वस्तू/वैयक्तिक वस्तू हलविण्यास अपयशी ठरल्यास, कंपनीला कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणवटदाराच्या जोखीम, जबाबदारी आणि खर्चावर "जे जसे आहे जेथे आहे, जे जसे आहे आणि जे काही आहे या तत्त्वावर" त्या हलविण्यास/काढून टाकण्यास/विल्हेवाट लावण्यास भाग पाडले जाईल. या संदर्भात कोणत्याही पक्षाने केलेल्या कोणत्याही दाव्यासाठी कंपनी जबाबदार राहणार नाही.

ठिकाण: महाराष्ट्र
दिनांक: ०४.११.२०२६

प्राधिकृत अधिकारी,
रिफॉर्म एआरसी लिमिटेड
(पूर्वी रिलायन्स असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)

नोंद: सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटीस जारी केल्यानंतर भरलेली रक्कम, काही असल्यास, वसुली/तडजोडीच्या वेळी देय असलेली थकबाकी निश्चित करण्यासाठी विचारात घेतली जाईल.

महाराष्ट्र शासन

सांस्कृतिक कार्य विभाग
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
आयोजित



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



पु.ल. कला महोत्सव २०२६
उत्सव कलांचा, उत्सव कलाकारांचा...



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

दि. ५ ते ८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत

स्थळ : पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई

सायं ७ ते ७:४५
रवींद्र नाट्यमंदिर
उद्घाटन समारंभ
शुभहस्ते
ॲड. आशिष शेलार
सांस्कृतिक कार्य मंत्री
प्रमुख उपस्थिती
मंगल प्रभात लोढा
कौशल्य विकास मंत्री
अनिल देसाई — लोकसभा सदस्य
महेश सावंत — विधानसभा सदस्य

गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर — रवींद्र नाट्यमंदिर
रात्रौ ८ ते १० **ती दोघं**
पु. ल. आणि सुनीताबाई यांच्यावर आधारित,
रत्नाकर मतकरी लिखित दोन अंकी नव्याकोऱ्या नाटकाचे अभिवाचन.
दिग्दर्शन : विजय केंकरे, अभिवाचक : विद्याधर जोशी, विजय केंकरे, सुप्रिया विनोद, सौरभ करंदीकर, हर्षदा बोरकर, आदित्य कदम, योगेश उतेकर, दीप्ती दांडेकर

दि. २ ते ७ नोव्हेंबर, दुपारी १२ ते रात्रौ १०
चित्रप्रदर्शन
अजिंठ्याचे लपलेले सौंदर्य
चित्रकार : एम. आर. पिंपरे
कलादालन, तळ मजला

दि. २ ते ७ नोव्हेंबर, दुपारी १२ ते सायं. ७
शिल्पकला कार्यशाळा, प्रात्यक्षिके, इंस्टॉलेशन्स
स्थळ कलांगण

शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर — रवींद्र नाट्यमंदिर
सायं. ६:३० ते ७:३०
नाट्यशाला निर्मित
दिव्यांग कलाकारांचा नाट्यप्रयोग
नमो भारतम्! वंदे मातरम्
निर्मिती संकल्पना : कांचन सोनटक्के, दिग्दर्शन : भरत मोरे
कलाकार : रोटरी संस्कारधाम अकॅडमीचे २७दिव्यांग कलाकार

रात्रौ ८ ते १०
विनोदी साहित्य, हास्यकविता आणि गाण्यांची हसरी मैफल!
हसता - हसवता
सहभाग : वैभव मांगले, भार्गवी चिरमुले, अधोक्षज कऱ्हाडे, श्रीरंग भावे, दीपाली देसाई, संहिता : मुकेश माचकर, संयोजन : मिती ग्रुप

शनिवार, दि. ७ नोव्हेंबर
पहाटे ६:३० ते ८:३० — कलांगण
उजळीत जग मंगलमय
पहाटेच्या रागांवर आधारित गाजलेल्या नाट्यपदांची सुश्राव्य मैफिल
संहिता व मार्गदर्शन : पं. मुकुंद मराठे
संवादिका : दीपाली केळकर
सहभाग: संपदा माने, प्राजक्ता मराठे, धवल भागवत, धनंजय पुराणिक, केदार भागवत

सायं. ६:३० ते ७:३० — रवींद्र नाट्यमंदिर
पु. ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकावर आधारित नाटक
पुलंची पिल्ले
संकल्पना व नाट्य रूपांतर : विजय लाड
दिग्दर्शन : हर्षद पांचाळ
कलाकार : विराज वेल्हाणकर, ऋग्वेद परांजपे, अयांश कांदळगांवकर, प्रज्वल चव्हाण, नहुष वैद्य, अर्जुन माने, दर्श विशे, आर्यन लोहकरे, विराट कुंटे

रात्रौ ८ ते १० — रवींद्र नाट्यमंदिर
मधु कांबीकर आणि शकुंतला नगरकर
लावणीच्या नभांगणातील या दोन लखलखत्या तारकांच्या आठवणींचा आणि लावण्यांचा सोहळा
लेखन-दिग्दर्शन : भूषण कोरगांवकर, कुणाल विजयकर
लावणी कलाकार : पुष्पा सातारकर, गौरी जाधव, गीता वाईकर, मीराबाई पुणेकर, लताबाई वाईकर, रुचिता जाधव, प्रिया टक्के, अक्षय मालवणकर

रविवार, दि. ८ नोव्हेंबर
पहाटे ६:३० ते ८:३० — कलांगण
नादमधुर पहाट
१० तबल्यांमधून विविध वाद्यांचे आवाज, साथीला ढोल, बासरी, व्हायोलिन, साईड रिदम, कि-बोर्ड, वाद्यांची बहारदार मैफिल
कलाकार : पं. शरदकुमार दांडगे व सहकारी
प्रबोध जोशी (व्हायोलिन), निरंजन भालेराव (बासरी)
ऋग्वेद कुलकर्णी (कि-बोर्ड), महेश साठे (साईड रिदम)

सकाळी १० ते दु. १ — रवींद्र नाट्यमंदिर
विनोदी संगीत नाटक
या इथे चाल बटाट्याची
मूळ लेखन व संगीत : पु. ल.देशपांडे
नाट्यरूपांतर : योगेश सप्रे, संगीत दिग्दर्शन : देवेंद्र भोमे
दिग्दर्शन : देवेंद्र भोमे, योगेश सप्रे

अभिनय : पंढरीनाथ कांबळे, अजित परब, मिलिंद जोशी, आशुतोष मुंगळे, अंजली मराठे, शमिका भिडे, स्वरांगी मराठे, केतन पवार, वज्रांग आफळे, मधुरा आफळे, तन्वी परांजपे, इशिता सावळे, साक्षी देशपांडे



देवेंद्र फडणवीस — मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे — उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार — उपमुख्यमंत्री
ॲड. आशिष शेलार — मंत्री, सांस्कृतिक कार्य

विनीत
डॉ. किरण कुलकर्णी (भा.प्र.से.) — सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग
मीनल जोगळेकर — संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
डॉ. दीपक करंजीकर — अध्यक्ष, सल्लागार समिती, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई

सस्नेह निमंत्रण | विनामूल्य प्रवेश

पुढील काही रांगा राखीव | प्रथम येणाऱ्यास प्राधान्य